Pune Vidyarthi Griha's
# Maharashtra Institute of Printing Technology
**(Government Aided)**
1786,Sadashiv Peth,Pune-30
Phone : 020-24470927, 24479058, 24470573
Fax : 020-24470642, E-mail : mipt.pvg@gmail.com

MIPT/ 2023-24/ Date : 01-01-2024

परिपत्रक

विषय- कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत..

संदर्भ- मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र.तंशिविकापु/शै.वि.-५/कोविड-१९ सवलत/२०२३/५८२०, दि.१९/१२/२०२३.

महाराष्ट्र मुद्रणतंत्र संस्थेत शिक्षण घेत असलेल्या डिप्लोमा इन प्रिंटींग टेक्नॉलॉजीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत पत्र प्राप्त झाले आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे.

Maharashtra Institute of Printing Technology 1786, Sadashiv Peth, Pune-30

(प्रा.पी.व्ही.शिंदे )
प्र.प्राचार्य
महाराष्ट्र मुद्रणतंत्र संस्था,पुणे.

प्रत:

१. संस्थेचे संकेतस्थळ.

२. नोटीस बोर्ड.

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.: तंशिविकापु/शै.वि.-५/कोविड-१९सवलत/२०२३/ 5820 दिनांक : 19 DEC 2023

**परिपत्रक अत्यंत महत्वाचे.**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विना अनुदानित संस्था.
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत....**

संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्र. : बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दि. ३०.०६.२०२३.
२) संचालनालयाचे पत्र क्र.: २अ/एडीएम/२०२१/३३३, दिनांक १०.०८.२०२३.
३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(९५/२३)/विशि-३/१४९१८ दि. १७.११.२०२३.
४) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D2ODEG/45/2023-DESK2/200541/2023 दिनांक १२-१२-२०२३.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. १ वरील शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते की, दि. २८. जून २०२१ रोजी मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मा. कुलगुरु यांनी दिलेल्या सहमतीनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना शासन पत्रात नमूद खालील मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना खालील प्रमाणे कळविण्यात आलेले होते.

१. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनीचे आई/वडील/पालक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे पदवी/ पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपुर्ण फी माफ करण्यात यावे.
२. अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ भागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पुर्णपणे माफ करण्यात यावे.
३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.
४. विद्यार्थ्यांव्दारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

Maharashtra Institute of Printing T...
Inward No 45
Date 26/12/2023
1786, Sadashiv Peth, Pune-30

कृ.मा.प.

५. विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगेझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीव्हल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही, त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

६. सन २०२२-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

७. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ टप्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने देखिल वेळोवेळी उपरोक्तबाबत अवगत केलेले आहे, तथापि सदर निर्देशांचे अनुपालन झाल्याचे दिसून येत नाही. तरी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यास्तव विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच विषयांकित प्रकरणी किती विद्यार्थ्यांना लाभ दिलेले आहे, याबाबतची वर्षनिहाय माहिती या विभागीय कार्यालयाच्या अधीनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमूखांनी या पत्रासोबत दिलेल्या गुगल फार्म https://forms.gle/C7S3gdUbZuD1V7Rp7 लिंकव्दारे त्वरीत सादर करण्यात यावी.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.